Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# मराठवाड्यातील कवितेचे स्वरूप

**चोथे विनायक शिवाजीराव**
संशोधक विद्यार्थी

**प्रा.डॉ. सोनवणे ए. बी.**
संशोधक मार्गदर्शक
मालवांचल विद्यापीठ, इंदौर

**प्रास्ताविक**

साहित्य हा समाजाचा आरसा असतो समाजाचे यथोचित चित्र लेखनामध्ये उमटत असते त्यामुळे समाज आणि साहित्य ह्या अभेद अशा दोन गोष्टी आहेत. त्या वेगळ्या करता येणार नाही तसे मराठी संस्कृती आणि मराठवाडा हा प्रदेश वेगळ्या पद्धतीने आपल्याला विचार करता येणार नाही. मराठवाडा ही भूमी संघर्षशील भूमी आहे. या ठिकाणी नानाविध स्वरूपाचे वेगळेपण पाहायला मिळेल. परिणामी मराठवाडा हा प्रदेश कोणत्याच गोष्टीमध्ये कमी असल्याचे दिसणार नाही. मराठवाड्याची असलेली समृद्ध परंपरा विचाराचा असलेला दृष्टी आणि दृष्टीकोन ऐतिहासिकता शैक्षणिक परंपरा सामाजिक विचारसरणी लेखन परंपरा काव्य वागणे प्रकाराच्या दृष्टीने विचारात घेतली या शोध निबंधात घेतली आहे.

मराठवाडा हा प्रदेश लेखन साहित्य परंपरेमध्ये नेहमीच अग्रेसर राहिलेला आहे. मराठी भाषा साहित्य संस्कृती जतन व संरक्षण करण्याचे काम मराठवाड्यातील लेखकांनी विचारवंतांनी केलेले आहे. मराठवाड्याच्या भूमीमध्ये अनेक संतांनी आपले विचार रुजवण्याचा प्रयत्न केलेला आहे. अगदी ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी पासून सुरू झालेली ही अखंड परंपरा आज देखील नित्यनेम सुरू आहे. अनेकांनी आपल्या जीवन जाणीवा आपले लेखनातून मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. ज्ञानेश्वराच्या ज्ञानेश्वरीला या ठिकाणचा वर्ग मोठ्या प्रमाणात मानताना दिसतो. एकूण आठ जिल्ह्यांमध्ये या मराठवाड्याचे स्थान आहे. हे आठही जिल्हे एक आपली लेखन साहित्य संस्कृती परंपरा घेऊन पुढे मार्ग आहेत. त्यामुळे मराठवाडा हा प्रदेश सातत्याने साहित्य लेखनामध्ये इतर प्रदेशाच्या प्रमाणात पुढे राहिलेला आहे. मराठवाड्याच्या भूमीमध्ये लेखन करताना पाहायला मिळतो त्याचा निर्देश करायचा झालास तर आपल्या असे लक्षात येईल की भास्कर चंदनशिव रा रं बोराडे नागनाथ कोत्तापल्ले वासुदेव मुलाटे हम शहाजींदे कौतिकराव ठाले पाटील, उत्तम बावस्कर, दादा गोरे, प्रल्हाद लुलेकर, दत्ता भगत, वामन निंबाळकर, गंगाधर पानतावणे, ऋषिकेश कांबळे, उत्तम बावस्कर अशा अनेक लेखक मंडळींनी मराठवाड्यातून ग्रामीण व दलित साहित्य प्रवाह विकसित केलेला आहे. मराठवाडा हा प्रदेश नेहमीच साहित्य लेखन परंपरा घेऊन पुढे मार्गक्रमण करताना दिसतो. मराठवाड्याच्या भूमीमध्ये अनेक लेखक साहित्यिक कवी, कादंबरीकार, लेखन करताना दिसतात आज असंख्य

प्राध्यापक, संशोधक, लेखक लिहीत आहे. वेगवेगळ्या विषयावर संशोधन करून भूभागाच्या विकासासाठी सातत्याने मांडणी करतो आहे. त्यामुळे लेखन परंपरेमध्ये हा मराठवाडा प्रदेश अधिक सधन व संपन्न आहे. परंतु विकसित दृष्टिकोनातून विचार केलास मराठवाडा प्रदेश आजही मागास प्रदेश असल्याचे चित्र सर्वांसमोर उभे आहे.

**मराठवाड्यातील कवितेचे स्वरूप**

मराठी साहित्यामध्ये आज मोठ्या प्रमाणामध्ये साहित्य लेखन होत आहे. त्याला मराठवाडा हा प्रदेश अपवाद नाही. आधुनिक मराठी साहित्यामध्ये उदयाला आलेल्या विविध साहित्य प्रकाराचा विचार करणे महत्त्वाचे ठरते त्यामध्ये प्रामुख्याने आपल्याला कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र अशा विविध वाङ्मय प्रकाराच्या माध्यमातून मराठवाड्यातील साहित्य लेखन समृद्ध झालेले पाहायला मिळते. याबरोबरच वैचारिक लेखनांनाही मराठवाड्याला सर्वच पातळ्यावर वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिलेले आहे. त्यामुळे या सर्वच वाङ्मय प्रकाराविषयी मराठवाड्यातील लेखकाला आपुलकी निर्माण दिसून येते. परिणामी मराठवाडा हा प्रदेश नानाविध जीवन जाणिवेने नटलेला प्रदेश म्हणून ओळखला जातो. या प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणात मराठी भाषेच्या संवर्धनासाठी लेखकांनी लेखन केल्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे सदर मुद्द्यांतर्गत आपल्याला मराठवाड्यातील कविता वाङ्मय प्रकाराच्या निमित्ताने झालेले लेखन अभ्यासणे फार महत्त्वाचे आहे.

कविता हा मराठवाड्यातील कवींचा जवळचा वाङ्मय प्रकार म्हणून ओळखला जातो. आपल्या जीवनानुभूती मोठ्या प्रमाणात मांडण्यामध्ये मराठवाड्यातील कवी कवयित्री यशस्वी झालेल्या पाहायला मिळतात. मराठवाड्यातील आधुनिक कालखंडामध्ये ललित वाङ्मय प्रांतात कविता हा महत्त्वाचा साहित्यप्रकार म्हणून ओळखला जातो. अगदी केशवसुतांनी आधुनिक मराठी काव्याची तुतारी फुंकली असे म्हटले जाते. मराठी साहित्य जगतात काव्य लेखनाला प्राधान्य आहे. तत्कालीन काळामध्ये सामाजिक राजकीय सांस्कृतिक निसर्गविषयक प्रेम विषयक भावनांनी प्रेरित होऊन कविता लेखन केल्याचे दिसते एकूणच काव्याच्या विकासाविषयी अनेकांनी आपले मत व्यक्त केल्याचे दिसून येते त्यामुळे या काव्य लेखनाच्या विकासासंदर्भात रा. श्री. जोग लिहितात, "मराठी कवितेमध्ये १८८५ ते १९२० या काळामध्ये अंतर बाह्य क्रांती झाली असे माझे मत आहे."

हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या दिनानिमित्त आपला जल्लोष-आनंद साजरा करताना कवी वा.रा. कांतांनी 'उघड ऊर्मिले कवाड' ही आपली कविता लिहिली असून तिचा त्यांनी 'वेलांटी' या आपल्या कवितासंग्रहात समावेश केला आहे. आज रोजी कांतांची जन्मशताब्दी आणि या कवितेचे नव्याने स्मरण होते.मराठवाड्यात पहिले राजकीय आंदोलन १९३८-३९ मध्ये झाले. निजामाच्या सत्तेला आव्हान देणारे नि:शस्त्र वीर पाहून त्या वेळच्या जनतेने उत्स्फूर्तपणे

केलेला त्याचा जयजयकार व त्यातून त्यांना आलेला निर्भयतेचा साक्षात्कार कांतांच्या या कवितेतून व्यक्त झाला आहे. हा साक्षात्कार कांत पुढील ओळीत व्यक्त करतात.

'धन्य आज दिन भीती सुटली
प्रभा नवी रविबिंब चढली
त्याग कांतिज्योतीत प्रगटली
जळता शलभ अपार'' (वेलांटी)

अशा ओजस्वी आत्माहुतीतून प्रगट होणारा निर्धार या अचूक ओळीतून व्यक्त झालेला आहे. मराठवाडा निझामी तावडीतून मुक्त झाला १७ सप्टेंबर १९४८ रोजी. त्या दिवशी पोलिस कारवाईच्या दिवशी 'उघड ऊर्मिले कवाड' या कवितेचा जन्म झाला. या कवितेत कवीने साफल्याच्या व कृतार्थतेच्या भावनेचे रंग दाखवले आहेत. ही कविता आणि पोलिस कारवाई (हैदराबाद) यांचा संबंध दाखवू शकत असली तरी तिला कविता म्हणून स्वतंत्र प्रतिभाविलास आहे. या कवितेतील काही कल्पना व ऊर्मिलेला घातलेला साद मोठा सूचक आहे. मराठवाड्याच्या स्वातंत्र्याचा लढा लढणारे वीर विजय संपादन करून म्हणत आहेत. 'उघड ऊर्मिले कवाड'- त्यांच्या या त्यागाचे व बलिदानाचे आज चीज झाले आहे. तो हाच दिवस जो १७ सप्टेंबर १९४८ या नावाने ओळखला जातो.. या ऊर्मिलेला जिचे नष्टचर्य संपलेले आहे. तिला साद देत कवी म्हणतो-

'लखलखते, धगधगते
कनकचक्र नभि फिरते
रविबिंब न अनिसद्धा गतिच युग युगाची
उघड ऊर्मिले कवाड उजळतसे प्राची', पृ. ७०

या ओळीत कालचक्राच्या गतिमानतेची, मराठवाड्याच्या इतिहासात एक नवी पहाट व्यक्त झालेली आहे. कवीने या कवितेचा शेवट करताना म्हटले आहे.-

'रात्रीचे तम पिऊन
ये पहाट ही हरखून
विष पचवूनि जय हसिले फुलति शंकराची
उघड ऊर्मिले कवाड उजळतिसे प्राची' पृ. ७०

यात नवी पहाट (हैदराबाद मुक्तिसंग्राम संपलेला दिवस) उगवलेली दिसेल. ही समग्र कविता आपल्या या प्रतिभा वैभवाने तिच्या आशयाशी एकरूप झाली आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या पार्श्वभूमीवर ही कविता वाचली तर तिचा आशय अधिक सखोल व सूचक दिसेल. किंबहुना यामुळेच तिचे सौंदर्य वाढलेले दिसेल.कांतांचा 'रुद्रविना' ज्या दिवशी प्रसिद्ध झाला त्या दिवशी औरंगाबाद येथे पोलिस कारवाई झाली होता.r. 'रुद्रविना' १९४७ मध्ये प्रसिद्ध झाला होता. या

कवीने आपल्या भोवतालच्या जीवनातून, जे जीवन त्या काळाच्या समस्येशी व्यापलेले आहे. हे अनुभव घेतले आहे. आपली स्वप्ने साकार करण्याची धडपड या कवितेतून दिसून येते. ही कविता आपल्या प्रतिभेने काळ निरपेक्षही होते व आपल्या ओजस्वी काळाचे दर्शनही घडवते. कुसुमाग्रजांच्या कवितेचा काळ आणि कांतांच्या कवितेचा काळ समांतर असल्याने हे दोघे कवी एकाच भावानुभावाचे धनी आहेत.

सामान्य जनमानसांचा हुंकार वा.रा. कांत यांच्या कवितेमधून अविस्कर झालेला आहे. त्यामुळे सामान्य माणसाचं जगणं स्वातंत्र्य प्रति असलेला आदर आणि निजामीविरुद्ध संघर्ष हा त्यांच्या काव्य लेखनामध्ये आलेला दिसून येतो अनेक लक्षणीय प्रश्न त्यांनी आपल्या लेखनामध्ये मांडलेले आहेत. निजामी राजवटीत होणाऱ्या अन्य अत्याचाराची दाद त्यांनी आपल्या लेखनात अविस्कृत केली आहे. म्हणून सामान्य माणसाचं जगणं हे निरपेक्ष भाव प्रधान असले पाहिजे ही लेखनिक साध त्यांनी आपल्या लेखनामध्ये मांडलेली आहे. परिणामी मराठवाड्याच्या इतिहासाची परंपरा तपासत असताना अनेक लोकांनी सांस्कृतिक परिवर्तनाला देखील नव्याने बळकटी यावी या प्रकारचे अपेक्षा त्या ठिकाणी ठेवलेल्या पाहायला मिळतात म्हणून लेखन आणि साहित्य आणि जीवन यांचा परस्पर संबंध मराठवाड्यातील लेखकांनी आपल्या लेखनामध्ये प्रकट केलेला आहे. त्या कारणाने मराठवाड्यातील लेखन हे वेगळ्या प्रकारचे ठरते असे आपल्याला दिसून येईल सामान्य माणसाच्या जीवनाला उन्नती प्राप्त व्हावी जीवन साहित्य आणि समाज यांचा ताळमेळ बसावा या प्रकारचे लेखन मराठवाड्यामध्ये लिहिलेली दिसतात अगदी बी रघुनाथच्या कालखंडाचा जरी आपण विचार केला तरी त्यामध्ये स्वातंत्र्याविषयी मांडलेले विचार सामाजिक जीवन जाणिवा अनुभवशीलता सूक्ष्मदृष्टीकोन या गोष्टी प्रकार त्याने पाहायला मिळतात मराठवाड्याच्या भूमीला एक वर्ष नंतर स्वातंत्र्य प्राप्त झाले त्या कालखंडात झालेल्या हाला पेस्ट देखील मराठी साहित्यामध्ये प्रकट झालेले दिसतात एकूणच मराठी साहित्याची परंपरा समृद्ध करण्यामध्ये मराठवाड्यातील लेखकांचा फार मोठा हातभार होता. व आजही आहे. असे आपल्या लक्षात येईल १९६० च्या नंतर जे मराठी साहित्यामध्ये वेगवेगळे वाङ्मय प्रकार उदयाला आले त्या वाङ्मय प्रकाराच्या निर्मितीची बीज देखील आपल्याला मराठवाड्याच्या भूमीमध्ये दडलेली दिसतात त्या दृष्टीने विचार केला असता मराठवाडा किती सदन आणि संपन्न लेखन परंपरेचा आहे. हे आपल्याला समजू शकेल याच धर्तीवर मराठवाड्यातील कविता पुढे जाताना दिसते आज मोठ्या प्रमाणामध्ये कवी आणि कवयित्री आपले अनुभव संपन्न जीवन मांडण्यामध्ये कुठेच कमी पडताना दिसत नाही खरंतर कविता ही माणसाचं स्व आत्मचरित्र असते आणि कवितेमध्ये अविस्कृत झालेले विचार हे लेखकाच्या जीवनाशी निगडित असल्यामुळे त्यात केवळ लेखक नसून एकूण समाजजीवन अविस्कृत होते याच सूक्ष्मदर्शन अनेक लेखनामध्ये आपल्याला पाहायला मिळेल. मानवी

जीवनाच्या उत्क्रांतीसाठी चाललेला हा लेखन प्रपंच खऱ्या अर्थाने वास्तवदर्शी स्वरूपाचा आहे. असे देखील आपल्याला स्पष्ट दिसते. परिणामी लेखनाची परंपरा आणि मराठवाडा भूप्रदेश यांना आपण वेगळे करू शकत नाही. आज मोठ्या प्रमाणामध्ये मराठवाड्याच्या भूमीत लेखन करणाऱ्याची परंपरा मोठी असलेली देखील पाहायला मिळेल. या दृष्टीने देखील मराठवाड्याच्या सर्वसामान्य माणसाचा हुंकार देखील आपल्याला पाहायला मिळतो. निजामी राजवटीमध्ये मराठवाड्याच्या वाट्याला आलेले यातनामय जीवन अनेक कवी आणि कवयित्रीने आपल्या लेखनात मांडलेले आहे.

मराठवाड्यातील कवी, कवयित्रींचे मध्ययुगीन व आधुनिक अशा दोन्ही कालखंडामध्ये साहित्य लेखनाच्या संदर्भातील योगदान महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. मध्ययुगीन कालखंडातील कवी मुकुंदराज संत ज्ञानेश्वर संत नामदेव यांनी मराठी काव्याला समृद्ध केलेली दिसते संत एकनाथ, दासोपंत ज्यांनी जनार्धन विष्णुदास नामा, संत रामदास, केशव स्वामी भागानगरकर, वामन पंडित, अमृतराय, माधव मुनेश्वर, मुक्तेश्वर हे कवी सर्वांना सर्वज्ञात आहेत. आधुनिक कालखंडामध्ये विसाव्या शतकाच्या प्रारंभीस नाटक आणि पद्यमय चरित्र लिहिणारे भगवंत गोविंद तोडेवाले मूळ नगरकर जिल्ह्यातील व नंतर नांदेड येथे स्थायिक झालेले गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे उर्फ दास गणू यांनी भक्ती लीलामृत संत कथामृत भक्ती सारा अमृत गोदा महात्म्य असे अनेक ग्रंथ लिहिलेले दिसून येते आज त्यांच्या नावावर ही साहित्य संपदा महत्त्वपूर्ण आहे. वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे कीर्तनकार आणि आख्यानकवी दे. ल. महाजन यांचाही उल्लेखनीय कवींमध्ये समावेश केला जातो. मराठवाड्यातील आधुनिक कविता येण्यास बराच कालावधी लागलेला आहे. समकालीन कालखंडानंतर मराठवाड्यात काव्याची पहाट उजाडलेली दिसून येते. काव्यची किरण येथील भूमीत पडण्यास प्रारंभ झालेला आहे. इसवी सन १९२० नंतर मराठवाड्यामध्ये जी काव्य प्रभावळ उदयास आली त्यामध्ये प्रामुख्याने नांदेड येथील देल महाजन यांना अग्रस्थान द्यावे लागते प्रसिद्ध कवी आख्यान कार टीकाकार कीर्तनकार अशी ज्यांची ओळख आहे. त्यांनी मराठवाड्यात आपले स्वतंत्र ओळख निर्माण केली याबरोबरच भाषांतर कार म्हणून देखील त्यांच्याकडे पाहिले जाते. मराठी कविता लिहिली जावी व तिचा प्रसार करण्यासाठी महाजन यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे. मराठ्या मराठवाड्याच्या भूमीमध्ये आपले साहित्य लेखन केलेले असून ते इतरांना प्रेरणादायी स्वरूपाचे असल्याचे आपल्याला जाणवते मराठवाड्यातील एकूणच काव्य प्रभाव सांगताना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष अभ्यासक न्यायाधीश नरेंद्र चपळगावकर लिहितात, "नांदेड व आसपासच्या भागात वाङ्मयावर प्रेम करणाऱ्या रसिकांचे व नव्याने लेखकांचे श्री महाजन यांनीही नेतृत्व केले त्यांना उत्तेजन व आधार दिला मराठवाड्यातील तत्कालीन मराठी कवींच्या कवितांचा एक प्रातिनिधिक संग्रह कवी संमेलन या नावाने व मोगलाईतील आधुनिक

कवींचे नवनीत या उपशीर्षकाने १९३१ स्वामी महाजनांनीच पुढाकार घेऊन संपादन करून काढला या संग्रहात श्री श्रीधर रामकृष्ण देव न.शे. पोहनेरकर, नारायणराव नांदापूरकर, दत्तात्रय पद्माकर, बापूराव हरसुलकर, विनायक बुवा वेरूळकर, विष्णू बाळकृष्ण, जोशी दासगणू, महाराज कृष्णकुमार, वाराकांत स्वत: देल महाजन, यादव सूत, मारुती बुवा ब्रह्मचारी, व्ही. अ. कानोले, सी. ग. मनाटकर, फुलारी श्रीपाद महादेव जिरे, अनंत गोपीनाथ, हिंगणीकर, श्री. वा. गाडगीळ, यशवंत सदाशिव कोरेकल, लक्ष्मीबाई लेले इत्यादींच्या कविता आहेत."

यावरून आपणास असे दिसून येते की इसवी सन १९३१ नंतर मराठवाड्याच्या भूमीमध्ये महत्त्वाची काव्यरचना करणारे म्हणून दे.ले. महाजन यांच्या कार्याची दखल घ्यावी लागते. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन मराठवाड्यामध्ये काव्यरचना घडून आणली त्यासाठी महत्त्वाचा प्रयत्न केले तरीदेखील दिसून येतो यातूनच पुढे मराठवाड्यातील कवींना काव्य लेखनाची जणू प्रेरणाच मिळाली आणि मराठवाड्यामध्ये कवींची एक पिढीच निर्माण झालेली आहे. या सर्वच कवींनी आपल्या काव्य लेखनाने मराठवाड्यातील कविता समृद्ध केलेली आहे. दे.ले. महाजन यांचे मातृदय हे गद्य काव्याचे पुस्तक १९२९ साली प्रकाशित झाले अनेक नियतकालिकांमधून प्रकाशित झालेल्या त्यांच्या कविता महाजनांची कविता म्हणून कृष्णकुमार व यादवसुत यांनी पुस्तक रूपाने प्रकाशित केलेले आहेत. हैदराबाद येथे राहून सिताराम गणपतराव मनाठकळ यशवंतराव कोरेकर आणि डॉक्टर नागो नांदापूरकर यांनीही काव्य लेखन केलेले आहे. नांदापूरकरांचे आरगळची राणी हे खंड काव्य प्रसिद्ध आहे. डॉ. श. जा. पुरवार, बा.ग हरसुलकर या औरंगाबादच्या कवींनी विपुल कविता लेखन केलेले दिसून येते.

खऱ्या अर्थाने भाव कवितेला मराठवाड्यातील भूमीने प्रधान्य देऊन कविता लेखन केलेले दिसून येते जुन्या व नव्या वळणाने आलेली आलाप आणि विलाप आडवीला आणि कविता हे काव्यसंग्रह रूपाने प्रसिद्ध आहेत. कविता ही स्वानंद सुखाय असते याचा भावपूर्ण प्रत्यय त्यांनी आणून दिला आहे. त्यांचा पुन्हा नभाच्या लाल कडा हा काव्यसंग्रह ही प्रकाशित झालेला आहे. या कवींच्या एकूणच काव्यातील काव्यात्मकता सांगताना प्राध्यापक मधु जामकर लिहितात की, "मराठवाड्यात शृंगारिक कविता अधिक कलात्मक पातळीवर नेणारी जी प्रवृत्ती आहे. तिचा उगम बी रघुनाथांच्या कवितेत दिसून येतो."

कविवर्य वा.रा. कांतांच्या कवितेवर एकूण जीवन अनुभवाचा प्रभाव दिसून येतो. कवार केवळ अनुकरणात न गुरफडता स्वतंत्र अनुभूतीचा प्रती आहे. त्यांच्या कवितेत येताना दिसतो त्यांनी भावकविता भावगीत खंडकाव्य मुक्तकाव्य आणि दोनोली सारखे काव्यप्रकार हाताळले आहेत. म्हणून त्यांच्या काव्यरचनाची तुलना करताना अनेकांनी लिहिले असले तरी प्रा जामकर म्हणतात "कै.बा. भ. बोरकरानंतर स्वतःला कवितेत झोकून देणारा कवी म्हणजे वा.रा. कांत आहेत." यामधून असे निष्पन्न होते की वा.रा.कांत यांची कविता अत्यंत मोलाचे योगदान देत

आलेली आहे. मराठवाड्याच्या सीमेत त्यांना अडकून ठेवता येणार नाही तर समग्र काव्याच्या प्रांतात या कवीचे लेखन महत्त्वाचे आहे.

मराठवाड्यातील कविता एकूण जीवन अनुभव प्रकट करताना दिसते या भूगाव भागामध्ये लेखन करणारे कवी अनेक जाणिवेतून कविता लिहिताना दिसतात दलित जाणिवेतून आलेली किंवा सामाजिक बांधिलकीतून लिहिल्या गेलेल्या कवितेत त्र्यंबक सपकाळ आणि शहाजींदे हे दोन कवी महत्त्वाचे आहेत. त्यांची कविता दलित काव्य प्रांताची समरस झालेली आहे. तरीदेखील त्यांनी स्वतःची अशी वाट निर्माण करून दलितकाव्याच्या सीमारेषा ओलांडून माणसाच्या भावनेला हात घातलेला आहे. सपकाळ यांचा तुरुंग हा काव्यसंग्रह या दृष्टीने महत्त्वाचा आहे. आणि शहाजिंदे यांनी निधर्मी काव्यसंग्रहातून सभोवतालच्या वास्तवाला जीवनवादी बनवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मराठवाड्यातील कवितेला मराठी कवितेत वेगळी अशी ओळख निर्माण करून देणारे लक्ष्मीकांत तांबोळी आणि प्रा. फ. मु. शिंदे ही दोन काव्य लेखनातील नावे मराठवाड्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. कोणत्याही परंपरेचा आधार न मानणारी या कवींची कविता ही मान व सन्मान अनुभवताना दिसते आत्मनिष्ठ अनुभव जपताना सौंदर्यवादी सामाजिक प्रभावाला विरोध करणारा पुशी रेगे यांचा प्रवाह अनु करणारे कवी प्रा चंद्रकांत पाटील व गोविंद कुलकर्णी हे महत्त्वाचे कवी म्हणून मान्यता पावलेले आहेत. कलात्मक आनंदासाठी त्यांची कविता वाहिली असल्याचे दिसते. मराठवाड्यातील काव्य प्रांतात स्वतःचे असे खास दालन समृद्ध केले ते ना. धो. महानोरांनी त्यांनी आपल्या काव्यात बालकवी, पाडगावकर, बोरकर, या कवींचा निसर्ग वेडा आवेग आणला आहे. महाराष्ट्राच्या काव्य प्रांतामध्ये रानातल्या कविता या संग्रहाणे अत्यंत मान मिळवलेला आहे. त्यांनी रानातल्या कविता या संग्रहात रान ही प्रतिमा शब्दसृष्टीत आणून काव्याला वेगळी ओळख निर्माण केली. या काव्यसंग्रहातून नव्हता व परंपरा या दोघांना समान धाग्यात गुंतण्याचा देखील प्रयत्न केलेला दिसतो. मराठवाड्यामुळे त्यांचे काव्य लेखन अगदी अनुभवशील पातळीवर उमटलेले आहे. मराठवाड्यातील काव्य हे महानोरांनी शिवारावर पोहोचल्याचे आज तरी काव्य समीक्षकांनी मान्य केले आहे. राजा मुकुंद हेही एक महत्त्वाचे मराठवाड्यातील नाव आहे. त्यांनी आपल्या कवितेने सर्वांना गावाकडे नेणारे आजच्या पिढीतले कवी इंद्रजीत भालेराव यांचेही नाव मराठवाड्याच्या काव्य क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचे आहे. याबरोबरच रमेश किल्ले या कवींच्या कविताचा ही अत्यंत महत्त्वाचा अनुभव आहे. त्याचबरोबर या समकालखंडामध्ये लेखन करणारे मराठवाड्यातल्या कवितेचा समृद्ध अविष्कार ज्यांच्या काव्य लेखनात दिसून येतो. त्यामध्ये अनेकांची नावे घेता येतील त्यामध्ये प्रामुख्याने आपल्याला श्रीधर नांदेडकर दासू वैद्य, ऋषिकेश कांबळे, पी विठ्ठल अभयदानी भास्कर निर्मळ पाटील रवी कोरडे, संदीप जगदाळे, देवानंद पवार, संतोष देशमुख, सुनील उबाळे, रामप्रसाद वावळ, धम्मपाल जाधव, निलेश

चव्हाण यांच्या नावाचा निर्देश करता येईल तर मराठवाड्याच्या भूमीमध्ये राहून काव्य लेखन करणाऱ्या महिला कवित्री म्हणून ज्यांनी आपल्या काव्य लेखनातून आपली स्वतंत्र नाममुद्रा उमटवली त्यामध्ये साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवयित्री अनुराधा पाटील, सुचिता खल्लाळ, शैलजा कारंडे, माधुरी चौधरी, मथुरा मेवाड, आशा डांगे, ज्योती सोनवणे, सविता करंजकर, संजीवनी तळेगावकर, अशा कितीतरी कवयित्री काव्य लेखन करताना दिसून येतात. आज मराठवाड्याच्या भूमी प्रदेशाचे वैशिष्ट्ये कवितेतून रेखाटले जाते. आहे. त्यामुळे मराठवाडा या प्रदेशाला काव्य प्रांतात स्वतःचे खास एक दालन आहे. हे दालन समृद्ध करण्यात अनेकांनी पुढाकार घेतल्याचा दिसते तशी वैचारिक लेखनाची परंपरा देखील मराठवाड्याला आहे. मराठवाडा हा भूप्रदेश या दृष्टीने वेगळा संपन्न असा आहे. त्यामुळे त्यांची लेखन परंपरा काही एक भौगोलिक स्थान स्पष्ट करताना दिसते अवतीभोवतीच समाज जीवन आपल्या कवितेत मांडून ही कविता खऱ्या अर्थाने नावारूपाला आलेली आहे. त्याबाग पाठीमागे असलेली जीवन जाणिवा त्या कवितेत प्रकाशाने पाहायला मिळतात. म्हणून ही अगदी उंचीवर जाणारी लेखन परंपरा आहे. असे म्हणता येईल.

**संदर्भ :**

१. डॉ. किरण देशमुख - 'असाही मराठवाडा' (मराठवाड्याचे सांस्कृतिक अंतरंग दाखविणारा ग्रन्थ), प्रकाशक : निर्मल प्रकाशन, नांदेड
२. जोग रा श्री, प्रदक्षिणा ( खंड पहिला) कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती पुनर्मुद्रण २००७ पृष्ठ क्रमांक १
३. वा. रा. कांतांची कविता चळवळीतून फुलली https://www.google.com/amp/s/ divyamarathied.bhaskar.comed
४. चपळगावकर नरेंद्र, मराठवाडा साहित्य संमेलनाची अध्यक्ष भाषणे भाग पहिला पूर्वक्ता २००७ पृष्ठ क्रमांक १
५. पाटील श्रीराम मायबोली मराठवाडा खंड एक उदधृत नरेंद्र चपळगावकर पूर्वक पृष्ठ क्रमांक २२
६. काळे भगवान संपादक मराठवाडा काल आणि आज उद्गृत प्राध्यापक मधु जामकर संकेत प्रकाशन जालना प्रथम आवृत्ती १९८६ पृष्ठ क्रमांक १२८